7

<u>मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे-समोरील</u>
<u>माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-</u>
<u>अपील क्रमांक-२०४९/२००७</u>

जा.क्र. 903

(१)- श्री जाधव विष्णु भगवान,
रा.- सावरखेड नागरे, ता.- देऊळगांव राजा,
जिल्हा- बुलडाणा

<u>वि रु ध्द</u>

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलडाणा

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी,(प्राथमिक )
जिल्हापरिषद, बुलडाणा

(आदेश पारित दिनांक १७ जानेवारी, २००९)

<u>निर्णय</u>

अर्जदार अपीलकर्ता श्री जाधव विष्णु भगवान,रा.- सावरखेड नागरे यांनी या खंडपीठाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत प्रस्तुत द्वितीय अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक १७ जानेवारी, ०९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अपीलकर्ता श्री जाधव विष्णु भगवान हे गैरहजर आहेत आणि जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण अधिकारी, (प्राथमिक) जिल्हापरिषद, बुलडाणा यांचे प्रतिनिधी हजर आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप-मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांचेवतीने प्रतिनिधी श्री वानखडे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत आणि सुनावणीदरम्यान उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सदरील अपिलाचेबाबतीत सुनावणीचे वेळी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण अधिकारी, (प्राथमिक) जिल्हापरिषद, बुलडाण यांचे प्रतिनिधी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप-मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांचेवतीने प्रतिनिधी श्री वानखडे यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार अपीलकर्ता श्री जाधव विष्णु भगवान यांना आवश्यक असलेली मागणीप्रमाणेची माहिती त्यांना दिनांक २८ जानेवारी, २००७ रोजी समक्षपणे पुरविण्यात आलेली आहे आणि याबाबत त्यांनी अर्जदार अपीलकर्ता यांना दस्तऐवज प्राप्त झाल्याबाबतची पोचपावतीची झेरॉक्स प्रत साक्षांकित असलेली आयोगासमोर दाखविली.

अर्जदार अपीलकर्ता श्री जाधव विष्णु भगवान यांना मागणीप्रमाणेची आवश्यक ती कागदपत्रें माहिती मिळालेली असल्यामुळे आणि सुनावणीदरम्यान ते गैरहजर असल्याने ते सदरील अपील पुढे चालविण्यास इच्छुक नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी आपले आजचे अनुपस्थितीबाबत व पुढील तारीख मिळण्याबाबत त्यांनी कोणताही अर्जवगैरे आयोगाकडे केलेला असल्याचे दिसून येत नाही वा त्यांनी आपला प्रतिनिधीसुध्दा पाठविलेला नाही.

वरील सर्व बाबींचा तपशीलवारपणे विचार करण्यात येऊन, अर्जदार अपीलकर्ता हे प्रस्तुत अपील चालविण्यास इच्छुक नसल्याचा त्यांचे अनुपस्थितीवरुन निष्कर्ष काढण्यात येतो व सदरील अपील हे निकाली काढण्यात येते.

(भास्कर पाटील),
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
अमरावती खंडपीठ, अमरावती

मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे-समोरील
माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-

अपील क्रमांक- २९२७/२००७

जा.क्र. 232 (१७)

(१)- अर्जदार तथा अपीलकर्ता
श्री शेषराव जयवंता अवसरमोल,
मु.- ब्राह्मण चिकणा, ता.- लोणार

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलडाणा

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लोणार

(आदेश पारित दिनांक- १९ जानेवारी, २००९)

## निर्णय

अर्जदार तथा अपीलकर्ता श्री शेषराव जयवंता अवसरमोल, मु.- ब्राह्मण चिकणा, यांनी या खंडपीठाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत प्रस्तुत द्वितीय अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक १९ जानेवारी, ०९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अर्जदार अपीलकर्ता श्री शेषराव जयवंता अवसरमोल, हे हजर आहेत तसेच उत्तरवादी म्हणून जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोणार श्री अरविंद उत्तमराव गुढधे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक प्रकल्प संचालक, डी आर डी ए श्री वाडेकर हे प्रतिनिधी म्हणून हजर आहेत.

प्रस्तुत अपीलाचे सुनावणीदरम्यान अर्जदार अपीलकर्ता श्री अवसरमोल यांचे म्हणणे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अर्जदार अपीलकर्ता यांनी उपरोक्त अधिनियमान्वये मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून, त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील पूर्णपणे दिलेला नसल्याने त्यांना मागणीप्रमाणेची माहिती पुरविता आलेली नसल्याचे सांगितले आहे. यावरुन असे निर्देशित करण्यात आले आहे की, अर्जदार अपीलकर्ता यांनी व्यक्तिश: जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात समक्ष हजर राहून, त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा सर्वसंबंधित दस्तऐवजाची तपासणी करावी तसेच, दारिद्रयरेषेखालील लाभधारकासंबंधीचे आवश्यक ते कार्ड पुरविण्याबाबत शासनाचे जे निकष आहेत, त्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे अर्जदार अपीलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणेची माहिती विनामूल्य पुरविण्यास जनमाहिती अधिकारी यांनी तयारी दर्शविलेली आहे. त्याप्रमाणे अर्जदार अपीलकर्ता यांनी दिनांक २९ जानेवारी, ०९ रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर राहून, आवश्यक असलेल्या दस्तऐवजाचे निरीक्षण करुन, त्यानुसार मागणीप्रमाणेचे आवश्यक त्या दस्तऐवजाची यादी तयार करुन त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना द्यावी व त्याप्रमाणे त्याचदिवशी जनमाहिती अधिकारी हे सदरहू अर्जदार अपीलकर्ता यांना मागणीप्रमाणेची आवश्यक असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देतील.

वरील सर्व बाबींचा तपशीलवारपणे विचार करुन अर्जदार व जनमाहिती अधिकारी यांचे संमतीने अर्जदार अपीलकर्ता यांचे सदरील अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

अर्जदार अपीलकर्ता यांनी दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात समक्ष जाऊन, त्यांनी मागणीप्रमाणेची आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन, जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदार अपीलकर्ता यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

(भास्कर पाटील),
राज्य माहिती आयुक्त

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे-समोरील
माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत अपील-
अपील क्रमांक- २९३३ /२००७

(१)- अर्जदार तथा अपीलकर्ता
श्री रामेश्वर विठ्ठल पातोडे,
मु.पा.- बाभूळगांव, ता.- पातूर

(२)- प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप-विभागीय अधिकारी,
बाळापूर

(३)- जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार, पातूर

(आदेश पारित दिनांक- १९ जानेवारी, २००९)

निर्णय

अर्जदार तथा अपीलकर्ता श्री रामेश्वर विठ्ठल पातोडे, मु.पा.- बाभूळगांव यांनी या खंडपीठाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम-१९-(३) अंतर्गत प्रस्तुत द्वितीय अपील-अर्ज दाखल केलेला असून, सदर अपिलाचेबाबतीत आज दिनांक १९ जानेवारी, ०९ रोजी सुनावणी घेण्यात आली असता, अर्जदार अपीलकर्ता श्री श्री रामेश्वर विठ्ठल पातोडे, मु.पा.- बाभूळगांव हे गैरहजर आहेत तसेच उत्तरवादी म्हणून जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पातूर श्री ठाकरे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप-विभागीय अधिकारी, बाळापूर श्री इंगळे हे हजर आहेत.

अर्जदार तथा अपीलकर्ता श्री रामेश्वर विठ्ठल पातोडे यांनी केलेल्या द्वितीय अपील अर्जाचे सुनावणीदरम्यान ते गैरहजर असून, याबाबतीत प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून उप-विभागीय अधिकारी श्री इंगळे यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार तथा अपीलकर्ता श्री रामेश्वर विठ्ठल पातोडे यांना दिनांक ७ सप्टेंबर, २००७ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणेची त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार कार्यालयाचे पत्राची झेरॉक्स प्रतदेखील सुनावणीदरम्यान प्रकरणात दाखल केलेली आहे.

अर्जदार तथा अपीलकर्ता श्री रामेश्वर विठ्ठल पातोडे हे प्रस्तुत अपीलाचे सुनावणीदरम्यान गैरहजर असल्याने, त्यांना मागणीप्रमाणेची आवश्यक असलेली माहिती मिळाली वा नाही, याबाबतचा निष्कर्ष काढता येत नाही. तथापि अर्जदार तथा अपीलकर्ता श्री रामेश्वर विठ्ठल पातोडे हे आज गैरहजर असल्याने, त्यांना मागणीप्रमाणेची आवश्यक ती माहिती मिळालेली असावी, तसेच त्यांचे अनुपस्थितीमुळे त्यांनी दाखल केलेले प्रस्तुत अपील चालविण्यास ते अनुत्सूक असल्याचे दिसून येत असल्याने, सदरील अपील खारिज करण्यात येते.

(भास्कर पाटील),
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
अमरावती खंडपीठ, अमरावती